प्रेस नोट ता. १०/०२/२०२५

## मतिन म. रफिक शेख सोलापूर व धाराशीव जिल्हयातून ०२ वर्षाकरीता तडीपार

इसम नामे, मतिन म. रफिक शेख, वय-४३ वर्षे, रा. सिध्देश्वर नगर भाग ०३, नई जिंदगी, सोलापूर याचेविरुध्द सन २०१६,२०१७, २०१९ व २०२४ या कालावधीमध्ये सर्वसामान्य नागरीक, व्यापारी यांचा विश्वास संपादन करुन जागेचे बनावट कागदपत्रे, वाहनांचे बनावट कागदपत्रे देवून त्या लोकांची फसवणुक करणे, अबला महिलांना दमदाटी करणे, खंडणी मागून पैसे उकळणे पैसे न दिल्यास मारहाण करणे यासारखे गुन्हे दाखल असल्याने त्याचेविरुध्द सदर बझार पोलीस ठाणेकडून महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ कलम ५६ (१) (अ) (ब) अन्वयेचा तडीपार प्रस्ताव पोलीस उप-आयुक्त (परिमंडळ), सोलापूर शहर यांना सादर करण्यात आला होता.

सदर प्रस्तावाचे अनुषंगाने श्री विजय कबाडे, पोलीस उप-आयुक्त (परिमंडळ), सोलापूर शहर यांनी कार्यवाही करुन, त्यांचेकडील तडीपार आदेश क्र.२१०/२०२५ दि.२९/०१/२०२५ अन्वये, इसम नामे, मतिन म. रफिक शेख, वय-४३ वर्षे, रा. सिध्देश्वर नगर भाग ०३, नई जिंदगी, सोलापूर यास सोलापूर व धाराशीव जिल्हा येथून दोन वर्षाकरीता तडीपार केले आहे.

**( व्ही. पी. रजपुत)**
**पोउपनि,वाचक अधिकारी,**
**पोउपआ परिमंडळ कार्या.सोलापूर शहर.**

Scanned with OKEN Scanner



Scanned with OKEN Scanner